ePaper
महाराज तिकीट द्या, नाहीतर दोरी द्या, उदयनराजे यांच्याकडे समर्थकाची अजब मागणी

वर्ष - 9 । अंक -146 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



## आतील पानांत


- विराट कोहलीचे शतक व्यर्थ
- जैस्वालने ध्रुव जुरेलवर हात उगारला
- पश्चिम बंगालला 830 कोटींची भेट देणार
- सुरक्षित मातृत्वाकडे एक पाऊल


www.mahaenews.com । सोमवार, दि. 19 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### महापौर पदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंचा स्पष्ट खुलासा

# फुटीचा धोका की दबावाचं राजकारण!

## महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे २९ नगरसेवक ताज लँड्स एंडमध्ये







**। पुणे। प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मुंबई महापालिकेतील महापौर पदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नवनिर्वाचित तब्बल २९ नगरसेवक मुंबईतील ताज लँड्स एंड या पंचतारांकित हॉटेलमध्ये मुक्कामाला असल्याची माहिती समोर येताच राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आलं.**

'फुटीचा धोका टाळण्यासाठी नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवण्यात आलं आहे का?', 'दबावाचं राजकारण सुरू आहे का?' अशा प्रश्नांची सरबत्ती होत असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः पुढे येत या संपूर्ण प्रकरणावर सविस्तर खुलासा केला.

### ताज लँड्स एंडमध्ये शिवसेनेचे २९ नगरसेवक मुक्कामी

मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) यांना २९ जागांवर यश मिळालं आहे. महापौर पद महायुतीकडे आणण्यासाठी ही संख्या निर्णायक ठरणार असल्याने, निवडणूक निकालानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक बांद्रा येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये एकत्र मुक्कामाला असल्याचं समोर आलं. यामुळेच 'ऑपरेशन लोटस', 'दगाफटका', 'नगरसेवकांना सांभाळून ठेवण्याची रणनीती' अशा चर्चा रंगू लागल्या.

### एकनाथ शिंदेंनी घेतली नगरसेवकांची भेट, केलं मार्गदर्शन

या सर्व चर्चांदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः हॉटेलमध्ये जाऊन नवनिर्वाचित नगरसेवकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सर्व नगरसेवकांचे अभिनंदन करत त्यांचा सत्कार केला, तसेच पुढील काळात महापालिकेत कसं काम करायचं, जनतेच्या अपेक्षा कशा पूर्ण करायच्या, याबाबत मार्गदर्शन केलं. शिंदेंनी नगरसेवकांशी संवाद साधताना विकास, प्रशासन, निधीचा योग्य वापर आणि वॉर्डस्तरीय कामकाजावर भर दिला.

**पंचतारांकित हॉटेलमधील मुक्कामावर 'दगाफटका' चर्चांवर शिंदेंनी दिलं थेट उत्तर "शिवसेना घाबरणारा पक्ष नाही... नवनिर्वाचित नगरसेवकांना मार्गदर्शन, गट फॉर्मेशन आणि संघटन मजबूत करण्यासाठीच हा मुक्काम" – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

### 'शिवसेना घाबरणारा पक्ष नाही' – शिंदेंचा ठाम दावा

नगरसेवकांना पंचतारांकित हॉटेलमध्ये का ठेवलं? या प्रश्नावर बोलताना एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "शिवसेना घाबरणारा पक्ष आहे का? शिवसेनेला घाबरणारी लोकं आहेत. नवीन निवडून आलेले नगरसेवक आहेत. ते पहिल्यांदाच एकत्र आले आहेत. एकमेकांच्या ओळखी वाढाव्यात, विचारांची देवाणघेवाण व्हावी, यासाठी त्यांना एकत्र ठेवलं आहे.

### मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि गट फॉर्मेशनसाठी मुक्काम

एकनाथ शिंदे यांनी पुढे स्पष्ट केलं की, हा मुक्काम पूर्णपणे संघटनात्मक आणि प्रशासकीय कारणांसाठी आहे. "जुन्या नगरसेवकांकडून प्रस्ताव कसे तयार करायचे, सभागृहात कसं बोलायचं, वॉर्डात विकासकामे कशी करायची याचं मार्गदर्शन मिळावं म्हणून हा मुक्काम ठेवला आहे. त्यामुळे थोडा वेगळा आनंद आणि संवादासाठी हा कार्यक्रम आहे," असं शिंदे म्हणाले.

### मुंबईचा महापौर कोण? शिंदेंचा दावा

मुंबईच्या महापौर पदाबाबत बोलताना एकनाथ शिंदे यांनी मोठा दावा केला. "मुंबईचा महापौर महायुतीचाच होईल," असं ठाम वक्तव्य त्यांनी केलं. यामुळे येत्या काळात महापालिकेतील सत्तासंघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हं दिसत आहेत. "निवडून आलेल्या नगरसेवकांना मार्गदर्शन करायचं होतं. वॉर्डात कसं काम करायचं, विकासकामांबाबत कसं पुढे जायचं, यासाठीच सगळे एकत्र आले आहेत. यात काही गैर नाही."

## 'जनतेनं आमचं काम स्वीकारलं' – शिंदेंचा आत्मविश्वास

महापालिका निवडणुकीतील निकालांवर भाष्य करताना शिंदेंनी आपल्या सरकारच्या साडेतीन वर्षांच्या कारकीर्दीवर भर दिला. "आमच्या साडेतीन वर्षांच्या कारकीर्दीला जनतेनं स्वीकारलं आहे. त्यामुळेच शिवसेनेला महापालिकेत चांगलं यश मिळालं. जनतेचा कौल आम्ही मान्य करतो. कुठे उणिवा असतील तर त्या दुरुस्त करू," असं ते म्हणाले. ठाकरेंवर शिंदेंची घणाघाती टीका या संपूर्ण प्रकरणावरून एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. "मुंबईत आम्ही २९ नगरसेवक निवडून आणले आहेत. हा जनतेचा आशीर्वाद आहे. जनतेनं आमचं काम स्वीकारलं आहे आणि त्यांचं काम नाकारलं आहे," अशी टीका त्यांनी केली. तसेच, "त्यांना त्यांची भीती आहे. त्यांनी त्यांचे नगरसेवक सांभाळून ठेवायचे," असा टोला शिंदेंनी लगावला.

राष्ट्रवादीला मोठा धक्का! शेळके यांचे खंदे समर्थक भाजपमध्ये दाखल

# मावळात राष्ट्रवादीला मोठा धक्का!

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार सुनील शेळके (SUNIL SHELKE) यांचे खंदे समर्थक तसेच मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत भागवत आणि त्यांच्या पत्नी मेघा भागवत यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. वडगाव मावळमध्ये (VADGOAN MAVAL) हा राष्ट्रवादीला मोठा धक्का मानला जात आहे.**

## कोणतीही अधिकृत माहिती नाही



आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळमध्ये ऑपरेशन लोटसला सुरुवात झाली आहे. जिल्हा परिषद इंदोरी-वराळे गटातून मेघा भागवत या राष्ट्रवादी काँग्रेसकडून इच्छुक उमेदवार होत्या. मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांना उमेदवारी नाकारण्यात आल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिला. यासंदर्भातील पत्र सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते. इंदोरी-वराळे गटात काँग्रेसमधून आलेल्या 'आयात' उमेदवाराला उमेदवारी दिली जाणार असल्याची शक्यता व्यक्त होत असल्याने भागवत दाम्पत्याने राष्ट्रवादीची साथ सोडत भाजपमध्ये प्रवेश केल्याची चर्चा आहे. आपल्या पत्नीला डावलले जाणार, ही शंका गृहीत धरूनच हा निर्णय घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. प्रवेशाच्या काही वेळ आधी आमदार सुनील शेळके यांना याबाबत विचारले असता, "प्रशांत भागवत आजही आमच्यासोबत आहेत," असा दावा त्यांनी केला होता. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशामुळे आमदार शेळके यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

प्रशांत भागवत यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले, "माझ्याकडे कोणताही राजीनामा आलेला नाही. तुमच्याकडे आला असेल, पण माझ्यापर्यंत पोहोचलेला नाही. प्रशांत भागवत कालही आमच्यासोबत होते आणि आजही दुपारपर्यंत माझ्याबरोबर होते. संध्याकाळी त्यांना काही निर्णयांबाबत चर्चा करायची होती. मात्र त्यांनी ब्राह्मणवाडीतील त्यांच्या घराचा कार्यक्रम असल्याचे सांगून जाण्याची परवानगी मागितली. ते अद्याप परत आलेले नाहीत. त्यामुळे आम्हाला राजीनाम्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नाही." असे मत आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केले.उमेदवारीबाबत बोलताना आमदार शेळके पुढे म्हणाले की, "त्याची उमेदवारी कोणी कापली? कोणाला दिली किंवा कोणाला नाकारली, याबाबत आम्ही अजून कोणताही निर्णय जाहीर केलेला नाही. कोअर कमिटीमध्ये याबाबत चर्चा सुरू आहे. उद्या युतीअंतर्गत काही जागा सोडाव्या लागल्या तर आम्हालाही ऐकावे लागेल, भाजपलाही ऐकावे लागेल आणि इच्छुक उमेदवारांनाही ऐकावे लागेल. योग्य वेळी सगळे स्पष्ट केले जाईल."जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार सुनील शेळके (SUNIL SHELKE) यांचे खंदे समर्थक तसेच मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत भागवत आणि त्यांच्या पत्नी मेघा भागवत यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. वडगाव मावळमध्ये (VADGOAN MAVAL) हा राष्ट्रवादीला मोठा धक्का मानला जात आहे.आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळमध्ये ऑपरेशन लोटसला सुरुवात झाली आहे.

## त्याची उमेदवारी कोणी कापली?

मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांना उमेदवारी नाकारण्यात आल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिला. यासंदर्भातील पत्र सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते. इंदोरी-वराळे गटात काँग्रेसमधून आलेल्या 'आयात' उमेदवाराला उमेदवारी दिली जाणार असल्याची शक्यता व्यक्त होत असल्याने भागवत दाम्पत्याने राष्ट्रवादीची साथ सोडत भाजपमध्ये प्रवेश केल्याची चर्चा आहे.

# जुन्नर तालुक्यात राजकीय रणधुमाळी

## ओतूर-रोहोकडी पंचायत समिती गणात राजकीय वातावरण तापू लागले

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जुन्नर तालुक्यातील ओतूर-रोहोकडी पंचायत समिती गणात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. या गणातील वर्चस्व राखण्यासाठी आणि प्रस्थापित सत्ताधाऱ्यांना आव्हान देण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भावी इच्छुक उमेदवारांनी गावोगावी भेटीगाठींचा धडाका लावला आहे. ओतूर-रोहोकडी हा गण राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा मानला जातो.**




सध्या या भागात इच्छुकांनी विविध सामाजिक कार्यक्रम, लग्नकार्ये, धार्मिक उत्सव आणि ग्रामपंचायत स्तरावरील छोट्या-मोठ्या बैठकांना उपस्थित राहून आपला जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला आहे. "कोण बाजी मारणार?" या चर्चेने आता गावागावातील चावडीवर जोर धरला आहे. जुन्नरच्या राजकारणातील बदललेली समीकरणे पाहता, या गणात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता आहे. मात्र, दोन्ही बाजूंनी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने उमेदवारी नक्की कोणाला मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यंदाच्या निवडणुकीत प्रस्थापित नेत्यांसोबतच अनेक सुशिक्षित आणि तरुण चेहरे रिंगणात उतरण्यास इच्छुक आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रचाराचा धुराळा उडवला जात आहे. शेतीचे प्रश्न, पाणी योजना, रस्त्यांची कामे आणि स्थानिक बेरोजगारी हे मुद्दे या गणात निर्णायक ठरणार आहेत.ओतूरसारख्या मोठ्या बाजारपेठेच्या गावापासून ते रोहोकडीच्या डोंगरदऱ्यातील वाड्या-वस्त्यांपर्यंत पोहचण्यासाठी उमेदवारांची दमछाक होत आहे.

## तरुण चेहरे रिंगणात उतरणार

"मतदारांच्या मनाचा कौल अद्याप गुलदस्त्यात असला तरी, इच्छुकांनी मात्र आतापासूनच 'फिल्डिंग' लावून प्रचारात आघाडी घेतली आहे. ही निवडणूक आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांसाठी रंगीत तालीम मानली जात आहे.जुन्नर तालुक्यातील ओतूर-रोहोकडी पंचायत समिती गणात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. या गणातील वर्चस्व राखण्यासाठी आणि प्रस्थापित सत्ताधाऱ्यांना आव्हान देण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भावी इच्छुक उमेदवारांनी गावोगावी भेटीगाठींचा धडाका लावला आहे.


## पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक आता महापौर कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष

# महापौरपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार?

## यंदा पहिली संधी चिंचवड की भोसरीला ; इच्छुकांची धावाधाव

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून अॅडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




पिंपरी चिंचवड- पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीने बहुमत मिळवत एकहाती सत्ता मिळवली आहे. आता महापौर कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शहरामध्ये भाजपामध्ये भोसरी आणि चिंचवड असे दोन गट आहे. तर पिंपरी विधानसभेमध्ये देखील पडद्याआडून सूत्रे हलविणाऱ्या चाणक्यांची चलती आहे. नक्की कोणाला महापौर, स्थायी समिती यासारखी महत्वाची पदे मिळणार याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापनेपासून भाजप कायमच विरोधी बाकावर बसत होता. मात्र, सन २०१७ मध्ये भाजपाने दमदार कामगिरी करत ७७ जागा मिळवल्या होत्या. त्यावेळी पालिकेतील बहुसंख्य नगरसेवक नवखे होते. असे असतानाही नवख्या नगरसेवकांना देखील महापौरपद, स्थायी समितीचे सभापतीपद अशा महत्वाच्या पदांवर काम करण्याची संधी पक्षाने दिली. सन २०१७ ते २०२२ या काळात नितीन काळजे, राहुल जाधव, माई ढोरे यांनी महापौरपद सांभाळले. तर सीमा सावळे, ममता गायकवाड, विलास मडेगिरी, संतोष लोंढे, ज्ञानेश्वर लांडगे यांनी स्थायी समितीचे सभापतीपद सांभाळले. आता पुन्हा एकहाती सत्ता आल्यामुळे महापौर पदाची संधी कोणाला मिळणार याकडे लक्ष लागले आहे. तर सत्तास्थापनेचे आकडे समोर आल्यानंतर तातडीने नवनिर्वाचित नगरसेवकांनी वशिला लावण्यास सुरूवात केली आहे.

### एकमताने होणार निर्णय

मात्र, भोसरी की चिंचवड गटाला महापौरपद मिळणार हे शहरातील नेत्यांच्या बैठकीतच ठरणार आहे. त्यासाठी आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी फासे टाकायला सुरूवात केली आहे. शहर पातळीवर हे नेते काम करत असले तरी महापौरपद आणि स्थायी समितीच्या सभापतींबाबत वरिष्ठ पातळीवरूनच निर्णय होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### सोडत कधी निघणार?

याबाबत उपायुक्त अण्णा बोदाडे म्हणाले, महापालिका निवडणुक निकाल लागून नवे सत्ताधारी कोण हे स्पष्ट झाले असले तरी अद्याप, महापौरपदाचे आरक्षण जाहीर झालेली नाही. त्यामुळे पुढील काही दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच महापौरपदासाठी नेमकी कोणाला संधी मिळणार हे स्पष्ट होणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये गेल्या दोन वेळा सर्वसाधारण व सर्वसाधारण महिला गटासाठी महापौरपद राखीव होते. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पहिली सर्वसाधारण सभा होईल यामध्ये महापौर निवड झाल्यावर महापौरांच्या आदेशानुसार पुढील सर्वसाधारण सभा निश्चित करण्यात येईल.

# पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादी पुनरागमनाची आशा मावळली!

## भाजपचा चौफेर वारू; राष्ट्रवादीचा प्रवास 83 वरून 37 पर्यंत

।पिंपरी चिंचवड।प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेवर २०१२ मध्ये तब्बल ८३ जागा जिंकत निर्विवाद सत्ता प्रस्थापित करणारा राष्ट्रवादी शहरातील सर्वांत बलाढ्य राजकीय पक्ष मानला जात होता. संघटनात्मक ताकद, प्रभावी स्थानिक नेतृत्व आणि सलग सत्तेमुळे राष्ट्रवादीचा हा गड अभेद्य असल्याची प्रतिमा तयार झाली होती. मात्र, २०१७च्या निवडणुकीत भाजपकडून राष्ट्रवादीचा पराभव झाला. आता पुन्हा भाजपने सत्ता स्थापन केली. तीन निवडणुकांत हा प्रवास ८३ वरून ३७ जागांपर्यंत घसरला.**



यंदा राष्ट्रवादीला केवळ ३७ जागांवर समाधान मानावे लागले. २०१७ पेक्षा फक्त एका जागेची वाढ पक्षासाठी काही दिलासादायक ठरली नाही. सलग दोन निवडणुकांत सत्ता गमावल्यानंतर एकेकाळी अभेद्य मानला जाणारा राष्ट्रवादीचा गड पूर्णतः ढासळल्याचे स्पष्ट झाले आहे. तर दुसरीकडे भाजपने पिंपरी चिंचवड शहरात 85 जागांवर निर्विवाद विजय मिळवला आहे. २०१७ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीला केवळ ३६ जागा मिळाल्या आणि पक्षाला सत्तेपासून दूर जावे लागले. त्यावेळी आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपमध्ये गेल्याने शहरात भाजपची ताकद वाढली. तसेच २०१७च्या निवडणुकीत भ्रष्टाचाराचे आरोप निर्णायक ठरले.

विशेषतः 'विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती घोटाळा' हा मुद्दा भाजपने आक्रमकपणे मांडला. या आरोपांमुळे राष्ट्रवादीची प्रतिमा ढागाळली आणि सत्ताधारी पक्ष म्हणून जनतेचा विश्वास डळमळीत झाला. सत्तेतील दर्प, अंतर्गत गटबाजी, काही नगरसेवकांविषयीची नाराजी आणि स्थानिक प्रश्नांकडे झालेले दुर्लक्ष याचा फटका पक्षाला बसला होता.

### अजित पवारांचा आक्रमक पवित्र

### सपशेल अयशस्वी

यंदा राष्ट्रवादी सत्तेत पुनरागमन करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमध्ये होती. दोन्ही राष्ट्रवादी शहरात एकत्र आल्या. प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर भ्रष्टाचार, गैरकारभार आणि विकासकामांबाबत आरोपांची झोड उठवत आक्रमक भूमिका घेतली होती. काही टप्प्यांवर राष्ट्रवादी प्रचारात आघाडीवर असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, ही आक्रमकता प्रत्यक्ष मतांमध्ये रूपांतरित होऊ शकली नाही.




भूमिका

# क्रमवारीत आघाडी, वास्तवात पिछाडी!

**गेल्या काही आठवड्यांत भारताविषयीच्या दोन बातम्या शेजारीशेजारी झळकल्या- जणू एकमेकींची थट्टाच करत असल्यासारख्या. पहिली बातमी विजयाची होती: भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले आहे.**

काही तज्ज्ञांच्या मते, ही वाढ अपेक्षेपेक्षा वेगाने झाली असून लवकरच भारत तिसऱ्या क्रमांकावरही पोहोचू शकतो. दुसरी बातमी मात्र भीषण होती- इंदूरमध्ये सांडपाण्याने दूषित झालेले नळाचे पाणी प्यायल्याने किमान सात जणांचा मृत्यू झाला आणि १६० हून अधिक लोकांना रुग्णालयात दाखल करावे लागले. मुख्य जलवाहिनीवर थेट शौचालय बांधण्यात आले होते; आवश्यक सुरक्षा टाकी नसल्याने मानवी मलजल पिण्याच्या पाण्यात मिसळले.या दोन बातम्या मिळून आधुनिक भारताची खरी कहाणी सांगतात- विरोधाभासाची नव्हे, तर सहअस्तित्वाची. आकडेवारी पाहता देश श्रीमंत होत असतानाच, वास्तव जीवनातील मूलभूत गरजा पूर्ण होत नसल्याने तो प्रत्यक्षात अतिशय गरीब राहू शकतो.सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) म्हणजे अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या वस्तू आणि सेवांचे मूल्य. ते पाणी पिण्यास सुरक्षित आहे का, टाळता येण्याजोगे आजार मुलांना होत आहेत का वा सार्वजनिक पायाभूत



सुविधा सक्षमपणे चालवल्या जातात का- हे मोजत नाही. जीडीपी व्यवहारांची बेरीज करतो; परिणामांचे लेखापरीक्षण करत नाही.

जागतिक जीडीपी क्रमवारीत भारताने घेतलेली झेप खरी आहे. तिच्यामागे देशाचा विस्तार, लोकसंख्येचे वजन आणि अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रांतील—विशेषत: सेवा, डिजिटल पायाभूत सुविधा आणि भांडवली निर्मितीतील—खऱ्या उत्पादकतेची वाढ आहे. मात्र विस्तार म्हणजे परिपूर्णता नव्हे. अर्थव्यवस्था मोठी असू शकते, तरीही ती नागरिकांच्या मूलभूत गरजा अपुऱ्या राहू शकतात. मोठ्या शहरात सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असेल, तर ती उत्पन्नाची नव्हे; शासन, नियमन आणि अंमलबजावणीची अपयशकथा आहे. ६ टक्के, ७ टक्के किंवा १० टक्के- कोणताही वाढ दर आपोआप ती समस्या सोडवत नाही.इंदूरची दुर्घटना केवळ दारिद्र्यामुळे घडलेली नाही. ती संस्थात्मक दुर्लक्षाची परिणती आहे. पाणीवाहिनीवर सुरक्षा टाकीशिवाय शौचालय बांधणे हे मूलभूत अभियांत्रिकी आणि सार्वजनिक आरोग्य नियमांचे उल्लंघन आहे. असे उल्लंघन देश गरीब असल्यामुळे होत नाही; नियमांकडे दुर्लक्ष आणि जबाबदारीचा अभाव यामुळे होते. हीच भारताच्या वाढीची अस्वस्थ करणारी सत्यकथा आहे: आर्थिक विस्ताराने राज्याच्या क्षमतेला मागे टाकले आहे. रस्ते, विमानतळ, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि कॉर्पोरेट नफा वेगाने वाढला; पण नगरपालिका शासन, नियामक देखरेख आणि स्थानिक सार्वजनिक सेवा तितक्याच वेगाने बळकट झाल्या नाहीत. पहिल्या प्रकारच्या यशाचे प्रतिबिंब जीडीपी अचूकपणे दाखवतो. दुसऱ्यांविषयी तो बहुतांशी मौन बाळगतो.भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असू शकतो; पण दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तो आजही खालच्या क्रमांकावर आहे. जपान किंवा जर्मनीसारख्या देशांच्या तुलनेत भारतातील सरासरी उत्पन्न आजही फारच कमी आहे. बातम्यांतल्या वाढीचे समर्थक म्हणतात की काळानुसार प्रति व्यक्ती उत्पन्न वाढेल. मात्र सरासरी आकडे अनेकदा वास्तव झाकून ठेवतात. असमान उत्पन्नवाढ लोकांच्या जीवनमानात फारशा सुधारणा करू शकत नाही, कारण सामान्यजनांचे जीवनमान सार्वजनिक व्यवस्थांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते- पाणी, स्वच्छता, आरोग्य, वाहतूक आणि शाळा इत्यादी. त्यांच्यासाठी समृद्धीची कसोटी जागतिक क्रमवारीत भारत कुठे आहे, ही नसून उद्या सकाळी नळाला पिण्यायोग्य पाणी येईल का, ही आहे.भारताने दृश्यमान पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे- महामार्ग, मेट्रो, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर... या प्रकल्पांचे फोटो छान दिसतात, उद्घाटन समारंभही भव्य असतात. जीडीपीमध्ये त्यांचा थेट वाटा असतो.बातम्या शेजारीशेजारी झळकल्या- जणू एकमेकींची थट्टाच करत असल्यासारख्या. पहिली बातमी विजयाची होती: भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले आहे.

## प्रासंगिक »

### कुत्र्याचा प्रश्न!

***भटक्या श्वानांचा विषय सर्वोच्च न्यायालयानेच गेल्या वर्षी जुलैमध्ये आपण होऊन सुनावणीस घेतला.***

रस्त्यावरले कुत्रे माणसांना चावले, तर ते रस्त्यावर का आहेत यावर उपायच न करणाऱ्या राज्य सरकारांना श्वानदंश झालेल्या व्यक्तीला मोठ्या रकमेची भरपाई द्यायला लावू. तसेच, या श्वानांना खायला घालणाऱ्यांनाही अशा प्रसंगांसाठी जबाबदार धरू, असे या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सुनावले. त्यावर दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद झाल्याने परवाची सुनावणी चर्चेचा विषय ठरली.भटक्या श्वानांचा विषय सर्वोच्च न्यायालयानेच गेल्या वर्षी जुलैमध्ये आपण होऊन सुनावणीस घेतला होता. त्यानंतर गेल्या सात नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन रस्त्यांवरील आणि शिक्षण संस्थांसह वेगवेगळ्या आस्थापनांच्या आवारांतील भटके श्वान हटवण्याचे आदेश दिले. या आदेशात सुधारणा करण्यासाठी दाखल अनेक याचिकांवर सध्याची सुनावणी सुरू आहे. भटक्या श्वानांच्या त्रासावर उपाय करायला हवा, यावर कोणत्याच बाजूचे दुमत नाही.

आपल्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनाचा असा कोणताही भाग उरलेला नाही, जो एखाद्या कायद्याने प्रभावित झालेला नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास हा कायद्याच्या कचाट्यात अडकलेला आहे,' असे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा अय्यर यांनी म्हटले होते.

## कायद्याची भाषा कळेना...

१९७८ च्या एका निर्णयात ते पुढे म्हणतात, 'पाश्चिमात्य देशांची नक्कल करून घाईघाईने तयार केलेले कायदे हे जनतेसाठी शिक्षा ठरतात. कायदा हा समाजाला दिशा देणारे साधन असायला हवा, पण तोच जर गोंधळ आणि विसंगती निर्माण करू लागला, तर त्याचा उपयोग समाजहितासाठी होत नाही.' लोकशाहीत, कायदे नागरिकांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी, समाजरचना घडवण्यासाठी आणि न्यायव्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी असतात, पण विरोधाभास असा की, कायद्याची भाषा एवढी गुंतागुंतीची असते की तो कायदा सामान्य माणसाच्या आकलनाबाहेर राहतो. खरं म्हणजे, कायद्याचा उद्देश स्पष्ट असायला हवा, पण गुंतागुंतीच्या आणि क्लिष्ट भाषेमुळे त्याचा अर्थ लावणे न्यायालयांनाही कठीण जाते. आपल्या देशाबद्दल बोलायचे झाले तर अशा उदाहरणांची एक जंत्रीच होईल. आरक्षण कायदा आल्यानंतर 'सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग' हा शब्द नेमका कोणासाठी लागू होतो, हे स्पष्ट



न केल्याने अनेक वर्षे वाद व खटले चालले. आयकर कायदा या संकल्पनेत कोणते स्रोत मोडतात? पगार, बोनस, भाडे, डिजिटल संपत्ती या संदिग्ध शब्दांमुळे प्रचंड वाद निर्माण झाले. १९८६ च्या पर्यावरण संरक्षण कायद्यात 'पर्यावरणाला हानिकारक पदार्थ' हा शब्द अस्पष्ट ठेवल्यामुळे, कोणत्या उद्योगांवर कारवाई करावी याबाबत राज्यांना व न्यायालयांना वेगवेगळी भूमिका घ्यावी लागली. भाडेकरू कायद्यात 'न्याय्य भाडे' हा शब्द नीट परिभाषित न केल्याने घरमालक आणि भाडेकरू यांच्यात कायमस्वरूपी वाद सुरू राहिला. भारतीय न्याय संहितेत देशद्रोहाच्या व्याख्येत 'डिसअफेक्शन' ऐवजी 'वेजिंग वॉर' हा शब्द आणला असला तरी भाषेतील संदिग्धता तशीच आहे, यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते. विशेष विवाह अधिनियमात ३० दिवसांची नोटीस अनेक जोडप्यांना छळाचा मार्ग मोकळा करून देते. 'हरकत' हा शब्द इतका अस्पष्ट आहे की वेगवेगळ्या न्यायालयांनी त्याचा वेगवेगळा अर्थ लावला. 'मकोका' मध्ये 'संघटित गुन्हेगारी' किंवा 'इन्सर्जन्सी' यांसारख्या शब्दांची व्याख्या न ठरल्याने जमीर अहमद प्रकरणात सर्वोच्च न्यायालयालाच स्पष्टीकरण द्यावे लागले. पोक्सो कायदा हा बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी असलेला कायदा. तो किशोरवयीन मुलामुलींच्या संमतीच्या नात्यांनाही गुन्हा ठरवतो. कौटुंबिक न्यायालय कायदा (१९८४) मध्ये समुपदेशन, पुनर्मिलन व अधिकारक्षेत्र यांबाबत स्पष्ट तरतुदी नसल्याने राज्यागणिक त्याचा वेगवेगळा वापर होतो. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश नेमणूक करताना कॉलेजिअम प्रणाली ही भारतीय घटनेत कुठेही नमूद नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## महापौर पदाचा पेच
## माझ्याकडे मागणी आलेली नाही : बावनकुळे

# सेनेला अडीच वर्षे महापौर पद हवे?

## भाजपाकडून पहिल्यांदाच भाष्य



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महापालिकेचे निकाल लागल्यानंतर राजकारण आणखी तापले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निकालानंतर अचानक २९ नगरसेवक मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवले आहेत. मुंबईचे महापौरपद अडीच वर्षे मिळावे, तसेच महापालिकेतील महत्त्वाच्या समित्या मिळाव्यात म्हणून भाजपावर हा दबाव निर्माण केला जात असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहेत. याचबद्दल भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारण्यात आले. महापौरपदाबद्दलचा निर्णय कसा होणार, याविषयी त्यांनी भाष्य केले.**

८९ जागा जिंकलेला भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला असला, तरी त्यांना सत्ता स्थापन करण्यासाठी शिंदेसेनेची मदत लागणार आहे. दोन्ही पक्ष युतीत लढले. भाजपाला चांगल्या जागा मिळाल्या, तर शिंदेसेनेचे २९ उमेदवारच नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. कमी नगरसेवक असले, तरी शिंदेंकडून भाजपावर दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे."आमचे संसदीय मंडळ आहे. तिथे जी काही मागणी आहे, ती येईल. माझ्याकडे तरी काही मागणी आलेली नाही. आमच्या संसदीय मंडळाच्या बैठकीमध्ये एकनाथ शिंदे हेही आहेत. आमच्या समन्वय समितीमध्ये देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे एकत्रित बसून निर्णय घेतील", असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. "जर मागणी असेल (महापौरपदाची) तर एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करतील. याबद्दल जी काही चर्चा करायची आहे, ती माध्यमांमध्ये होत नाही. पत्रकारांशी होत नसते, ती एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्येच होईल", असे सांगत चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबद्दल अधिक बोलणे टाळले. शिंदेसेनेचे नगरसेवक सध्या मुंबईमधील ताज लँड्स एन्ड हॉटेलमध्ये आहेत. काही नगरसेवक उद्धव ठाकरेंच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. काही नगरसेवकांनी ठाकरेंबद्दल आमच्या मनात अनादर नाही, असेही म्हटल्याचे काही माध्यमांनी वृत्त दिले आहे. नगरसेवक फुटू नये म्हणून हॉटेलमध्ये ठेवल्याची चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू आहे. याबद्दल अद्याप खात्रीलायक माहिती मिळू शकलेली नाही. दुसरीकडे मुंबई महापालिकेत महत्त्वाच्या समित्या मिळाव्यात म्हणून शिंदेसेनेचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे भाजपावर आधीपासूनच दबाव टाकण्यासाठी नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवले गेल्याची चर्चा आहे.मुंबई महापालिकेचे निकाल लागल्यानंतर राजकारण आणखी तापले आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निकालानंतर अचानक २९ नगरसेवक मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवले आहेत. मुंबईचे महापौरपद अडीच वर्षे मिळावे, तसेच महापालिकेतील महत्त्वाच्या समित्या मिळाव्यात म्हणून भाजपावर हा दबाव निर्माण केला जात असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहेत. याचबद्दल भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारण्यात आले. महापौरपदाबद्दलचा निर्णय कसा होणार, याविषयी त्यांनी भाष्य केले. ८९ जागा जिंकलेला भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला असला, तरी त्यांना सत्ता स्थापन करण्यासाठी शिंदेसेनेची मदत लागणार आहे.शिंदेसेनेचे २९ उमेदवारच नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. कमी नगरसेवक असले, तरी शिंदेंकडून भाजपावर दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

### भाजपावर आधीपासूनच दबाव

"आमचे संसदीय मंडळ आहे. तिथे जी काही मागणी आहे, ती येईल. माझ्याकडे तरी काही मागणी आलेली नाही. आमच्या संसदीय मंडळाच्या बैठकीमध्ये एकनाथ शिंदे हेही आहेत. आमच्या समन्वय समितीमध्ये देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे एकत्रित बसून निर्णय घेतील", असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. तर एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करतील.

# कोणत्या पक्षाचे लोक नॉट रिचेबल होतील

## लोकांनी शिंदेंना काही सल्ला देऊ नये : सामंतांचा ठाकरेंना टोला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आम्ही नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवलं त्यावरून उलट सुलट चर्चा सुरु आहे. आम्ही जे पूर्वी झालं तसं करणार नाही, आम्ही युतीत निवडणुका लढवल्या आहेत असे मत मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केलं. काही लोकं आमची नाहक बदनामी करत आहेत. मात्र, कोण नॉट रिचेबल आहे हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल असेही उदय सामंत म्हणाले.**

2019 मध्ये जो उठाव झाला त्यातून काही आत्मचिंतन करणं गरजेचं आहे असं म्हणत उदय सामंत यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. महापौर होताना कोणत्या पक्षाचे काही लोक नॉट रिचेबल असतील हे येणाऱ्या काळात दिसेल असेही उदय सामंत म्हणाले.या लोकांनी एकनाथ शिंदेंना काही सल्ला देऊ नये, अशी टीका देखील उदय सामंत यांनी ठाकरे गटावर केली. महापौर होताना कोणत्या पक्षाचे काही लोक नॉट रिचेबल असतील हे येणाऱ्या काळात दिसेल असेही उदय सामंत म्हणाले. महापालिका निवडणुका पार पडल्या आहेत. राज्यभरात शिवसेना दोन नंबरवर आहे. राज्यात 402 ठिकाणी आम्हाला विजय मिळाला आहे. मात्र, जे आमच्यावर आगपाखड करतात त्यांना केवळ 100 हून अधिक जागा मिळाल्याची टीका उदय सामंत यांनी ठाकरे गटावर केली. निवडणुकीत जिथे कुठे चुकलयं याचं आम्ही नक्कीच आत्मपरीक्षण करु असेही उदय सामंत म्हणाले. ज्यांनी 2019 ला युतीत लढून काँग्रेससोबत जाण्याचा निर्णय केला त्यामुळे MIM ची ताकद मुंबईत वाढल्याचे सामंत म्हणाले. जिल्हा परिषदेत कोकणात युती जाहिर केली आहे.12 ठिकाणी युतीत लढू ही शक्यता नाकारता येणार नाही असेही सामंत म्हणाले. रायगडमध्ये 59 जागा आहेत. रायगडमध्ये राजकीय प्रवाह काय सुरू आहे. याबाबत आम्ही बैठका घेतल्या आहेत. याची माहिती खालील नेत्यांना दिलेली आहे. ही आमची उठावानंतर पहिली निवडणूक होती असेही सामंत म्हणाले. अनेक ठिकाणी चांगला निकाल आला जिथे कमी पडलो त्याचं आत्मपरीक्षण करु असेही सामंत म्हणाले. राऊतांनी फडणवीस यांच्याबाबत केलेलं ट्विट हा टोमणा होता की कौतुक हे तुम्हीच शोधा असेही सामंत म्हणाले. ठेवलं त्यावरून उलट सुलट चर्चा सुरु आहे. आम्ही जे पूर्वी झालं तसं करणार नाही, आम्ही युतीत निवडणुका लढवल्या आहेत असे मत मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केलं. काही लोकं आमची नाहक बदनामी करत आहेत.



### उलट सुलट चर्चा सुरु

येणाऱ्या काळात स्पष्ट होईल असेही उदय सामंत म्हणाले. 2019 मध्ये जो उठाव झाला त्यातून काही आत्मचिंतन करणं गरजेचं आहे असं म्हणत उदय सामंत यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. महापौर होताना कोणत्या पक्षाचे काही लोक नॉट रिचेबल असतील हे येणाऱ्या काळात दिसेल असेही उदय सामंत म्हणाले.

## 830 कोटींच्या कामांचे लोकार्पण | पंतप्रधान नरेंद्र मोदी पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर

# पश्चिम बंगालला 830 कोटींची भेट देणार

## अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा



। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी बंगालमध्ये 830 कोटींच्या कामांचे लोकार्पण आणि उद्घाटन करणार आहेत. पंतप्रधान मोदी आज सिंगूर जिल्ह्याल भेट देणार आहेत. त्या ठिकाणी ते रेल्वेशी संबंधित आणि पायाभूत सुविधानशी संबंधित कामांची सुरुवात करणार आहेत. तसेच ते परिवर्तन संकल्प सभेच्या माध्यमातून जनतेला संबोधित करणार आहेत.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालमधील सिंगूर जिल्ह्यात 830 कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण अन् उद्घाटन करणार आहेत. 3 वाजता मोदी एका प्रशासकीय कार्यक्रमात सहभाग होणार आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून बंगालमधील पायाभूत सुविधा मजबूत करणे हे उद्देश असणार आहे. यातून राज्याची अर्थव्यवस्था मजबूत होण्यासाठी फायदा होणार आहे. आज रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून तीन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. दरम्यान आज पंतप्रधान नरेंद्र मोदी परिवर्तन संकल्प सभेला संबोधित करणार आहेत. यामुळे पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण तापले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजच्या सभेसाठी उत्सुक आहेत. तसेच तृणमूल काँग्रेस आक्रमक भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे. विकासकामांचे लोकार्पण आणि उद्घाटन याकडे आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने पाहिले जात आहे.महाराष्ट्राचे आभार ! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत! विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा , राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे.महाराष्ट्रभर जनतेसोबत राहून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या एनडीएच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी आमच्या युतीच्या कामगिरीबाबत माहिती देताना, आगामी काळासाठीचा आमचा दृष्टीकोण ही अधोरेखित केला आणि विरोधकांच्या खोट्या आरोपांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी बंगालमध्ये 830 कोटींच्या कामांचे लोकार्पण आणि उद्घाटन करणार आहेत. पंतप्रधान मोदी आज सिंगूर जिल्ह्याल भेट देणार आहेत. त्या ठिकाणी ते रेल्वेशी संबंधित आणि पायाभूत सुविधानशी संबंधित कामांची सुरुवात करणार आहेत. तसेच ते परिवर्तन संकल्प सभेच्या माध्यमातून जनतेला संबोधित करणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालमधील सिंगूर जिल्ह्यात 830 कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण अन् उद्घाटन करणार आहेत. 3 वाजता मोदी एका प्रशासकीय कार्यक्रमात सहभाग होणार आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून बंगालमधील पायाभूत सुविधा मजबूत करणे हे उद्देश असणार आहे. यातून राज्याची अर्थव्यवस्था मजबूत होण्यासाठी फायदा होणार आहे. आज रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून तीन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. दरम्यान आज पंतप्रधान नरेंद्र मोदी परिवर्तन संकल्प सभेला संबोधित करणार आहेत. यामुळे पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण तापले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजच्या सभेसाठी उत्सुक आहेत. तसेच तृणमूल काँग्रेस आक्रमक भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे.

### महायुतीचे अभिनंदन केले

विकासकामांचे लोकार्पण आणि उद्घाटन याकडे आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने पाहिले जात आहे.महाराष्ट्राचे आभार ! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत! विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे.

# सुरक्षित मातृत्वाकडे एक पाऊल

## योजनेअंतर्गत महिलांना मोफत आणि दर्जेदार आरोग्य सेवा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आरोग्य सेवांचा मूळ उद्देश आरोग्य सुधारणे हा असून, लोकांचे जीवनमान सुधारावे व जगता यावे यासाठी आरोग्य शिक्षण व सेवा यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य सेवा ही सामाजिक आरोग्य क्षेत्र, यात प्राथमिक आरोग्य सेवा, उपकेंद्र, ग्रामीण आरोग्यकेंद्र सेवा यावर भर देण्यात आला आहे.**

आरोग्य सेवा ही सामाजिक आरोग्य क्षेत्र, यात प्राथमिक आरोग्य सेवा, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचाही समावेश होतो. या माध्यमातून लोकांना आरोग्य सेवांची उपलब्धता करून देण्यात येते. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या वतीने त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आलेल्या आहेत. या आरोग्य सेचा अधिकाधिक लोकाभिमुख शल्पास लोकांना चांगले आरोग्य लाभून आरोग्य सुधारण्यासाठी नक्कीच मदत घेऊ शकते. खाजगी क्षेत्र या माध्यमातून अंगीकृत गयालयातून आपल्या सेवा या देत असतात. त्या सेवांशीही शासन सामाजिक आरोग्य क्षेत्राशी जोडण्याचा प्रयत्न करीत आलेले आहे. निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने विविध महाआरोग्य योजना सामान्य माणसासाठी शासनाच्या वतीने साकारलेल्या योजनांची माहिती देऊन लोकांनी उपयोग घेण्यासाठी व त्या लोकाभिमुख करण्यासाठी शासनाच्या प्रयत्न आहे. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाचे आयोजन दर महिन्याच्या नऊ तारखेला रविवारी किंवा सुट्टी असेल तर त्यापुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी राबविण्यात येते. जिल्लास्तरावर सदर अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ला नियोजन आणि कार्यकारी समिती गठित करण्यात आलेली आहे.प्रसुतीपर्व तपासणीसाठी आलेल्या सर्व लाभार्थीचा रक्तदाब, पोटावरून तपासणी व गर्भपिंडाच्या हृदयाचे ठोके तपासतात. शोधलेल्या सर्व अतिजोखमीच्या मातांना उच्च संस्थेमध्ये पुढील उपचारासाठी संदर्भित केले जाते. आणि जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत उच्च संस्थेमध्ये योग्य ते उपचार दिले जातात सर्व लाभार्थीना एम सी पी कार्ड देण्यात येते.सर्व गरोदर मातांची गरोदरपणातील दुसऱ्या व तिसऱ्या टप्यात एक सोनोग्राफी करण्यात येते. संस्थात्मक प्रसूती व प्रसुती पश्चात कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन केले जाते.




### स्वेच्छेने विनामूल्य सेवा

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान राबविण्यात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप सहभागशासकीय संस्था वगळता अजून एखादी खाजगी संस्था स्वेच्छेने विनामूल्य सेवा सदर अभियानाच्या दिवसाच्या दिवशी देण्यास तयार असल्यास त्यांना या अभियानामध्ये समाविष्ट करून घेतले जाते. त्यांच्यामार्फत वर नमूद केलेल्या सेवा त्यांच्या स्वतःच्या संस्थेमध्ये देण्यात येतात.


# देशमुखांच्या घरात लहान मुलं जपतात 'ही' अनोखी परंपरा

रितेश देशमुख आणि जिनिलीया देशमुख यांची दोन्ही मुलं रियान आणि राहील सोशल मीडियावर त्यांच्या कृतीमुळे कायमच चाहत्यांचे लक्ष वेधून घेतात. अनेकदा ते कॅमेऱ्यासमोर आले की हात जोडून उभे राहतात. यामुळे त्यांच्यावरील संस्कारांचं कायमच कौतुक केलं जातं. पण रियान आणि राहिल यांच्यासह देशमुख कुटुंबातल्या प्रत्येकावर उत्तम संस्कार आहेत. देशमुखांच्या कुटुंबातल्या मुलांवर असलेले संस्कार अनेकदा सोशल मीडियावरील विविध पोस्टमधून पाहायला मिळाला आहे. अशातच आता देशमुखांची सून दीपशिखा यांनी शेअर केलेल्या पोस्टमधूनही देशमुखांच्या घरचे संस्कार पाहायला मिळत आहे. दीपशिखा या सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या विविध पोस्ट शेअर करीत असतात. सासू वैशाली देशमुख यांनी बाभळगावात केलेल्या शेतीची खास झलकसुद्धा त्या आपल्या सोशल मीडियाद्वारे शेअर करीत असतात. अशातच त्यांनी मुलांचा एक फोटो शेअर केला आहे.रितेश देशमुख आणि जिनिलीया देशमुख यांची दोन्ही मुलं रियान आणि राहील सोशल मीडियावर त्यांच्या कृतीमुळे कायमच चाहत्यांचे लक्ष वेधून घेतात. अनेकदा ते कॅमेऱ्यासमोर आले की हात जोडून उभे राहतात. यामुळे त्यांच्यावरील संस्कारांचं कायमच कौतुक केलं जातं. पण रियान आणि राहिल यांच्यासह देशमुख कुटुंबातल्या प्रत्येकावर उत्तम संस्कार आहेत. देशमुखांच्या कुटुंबातल्या मुलांवर असलेले संस्कार अनेकदा सोशल मीडियावरील विविध पोस्टमधून पाहायला मिळाला आहे. सून दीपशिखा यांनी शेअर केलेल्या पोस्टमधूनही देशमुखांच्या घरचे संस्कार पाहायला मिळत आहे. दीपशिखा या सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या विविध पोस्ट शेअर करीत असतात. सासू वैशाली देशमुख यांनी बाभळगावात केलेल्या शेतीची खास झलकसुद्धा त्या आपल्या सोशल मीडियाद्वारे शेअर करीत असतात. अशातच त्यांनी मुलांचा एक फोटो शेअर केला आहे.रितेश देशमुख आणि जिनिलीया देशमुख यांची दोन्ही मुलं रियान आणि राहील सोशल मीडियावर त्यांच्या कृतीमुळे कायमच चाहत्यांचे लक्ष वेधून घेतात. अनेकदा ते कॅमेऱ्यासमोर आले की हात जोडून उभे राहतात. यामुळे त्यांच्यावरील संस्कारांचं कायमच कौतुक केलं जातं. पण रियान आणि राहिल यांच्यासह देशमुख कुटुंबातल्या प्रत्येकावर उत्तम संस्कार आहेत.

## नितीन बोरकर काळाच्या पडद्याआड!

मराठी सिनेसृष्टीत नावाजलेला कला दिग्दर्शक नितीन बोरकर याचे निधन झाले आहे. त्याच्या निराधानाच्या बातमीने संपूर्ण मराठी सिनेसृष्टी तसेच हिंदी सिनेसृष्टीतही शोककळा पसरली आहे. त्याच्या निधनाची बातमी येताच मराठी सिनेसृष्टीतील अनेक कलाकारांनी सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांवर शोक व्यक्त केले आहे. नितीन हा गेल्या काही दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत होता. अखेर त्याची ही झुंज अयशस्वी ठरली आहे आणि तो काळाच्या पडद्याआड झाला आहे.रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी, नेरूळचा DY पाटील हॉस्पिटलमध्ये नितीन बोरकरवर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान त्याने जीव सोडला. ब्रेन स्ट्रोकसारख्या जीवघेण्या आजाराने शेवटी नितीन बोरकरला कायमचं हरवलं. त्याच्या जाण्याने सिनेसृष्टीने एक उत्तम कलाकार आणि दिग्दर्शक गमावला आहे. नितीन बोरकरने अनेक हिंदी तसेच मराठी सिनेमांसाठी काम केले आहे. त्याने सलमान खानचा गाजलेला सिनेमा 'बॉडीगार्ड' तसेच इतर सिनेमे 'द माईटी हार्ट', 'आणि काय हवं?' आणि 'कदाचित' सारख्या गाजलेल्या सिनेमांमध्ये कला दिग्दर्शकाची भूमिका निभावली आहे.

## काय करावं हे बघितलं पाहिजे



झी मराठीवरील 'काहे दिया परदेस' या लोकप्रिय मालिकेमधून प्रेक्षकांच्या घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे सायली संजीव. या मालिकेत तिने साकारलेली गौरी आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. या मालिकेनंतर सायलीने अनेक मालिका व चित्रपटांमध्ये काम केलं आहे. अभिनय क्षेत्रात सक्रीय असणाऱ्या सायलीला राजकारणातही तितकाच रस आहे. त्यामुळे भविष्यात अभिनेत्री राजकारणात सक्रीय होणार आहे. सायली संजीवने नुकतीच 'सुमन म्युझिक मराठी'च्या 'आम्ही असं ऐकलंय' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी सायलीला ती राजकरणात एन्ट्री करणार आहे का? यावर सायलीने तिची राजकारणात येण्यासाठीची इच्छा व्यक्त केली. तसंच राजकारणाला तरुणांनी करिअरचा एक पर्याय म्हणून बघितलं पाहिजे असं मतही व्यक्त केलं.याबद्दल सायली म्हणाली, "मला सक्रीय राजकारणात सहभागी होऊन काम करायचं आहे. मी जेव्हा राजकारणात येईन तेव्हा काही गोष्टी कदाचित बदललेल्या असतील. त्यामुळे मला आज ज्या समस्या आहेत त्याकडे बघून मी माझं तेव्हाचं ध्येय ठरवलं, तर त्याचा आता काय फायदा होणार नाही. तेव्हा त्याचा तसा संबंध नसेल."यापुढे ती म्हणाली, "मला लहानपणापासून वाटतं की, इथे घाण आहे, हा रस्ता खराब आहे, इथे पाणी नाही किंवा वीज नाही. काही ठिकाणी खड्डे तर आहेतच; पण साधा रस्तासुद्धा नाही. तर याबद्दल आपण सतत तक्रारी करण्यापेक्षा मला असं वाटतं की, आपण ते करुन बघू आणि जर ते आपल्याला जमलं तरच आपल्याला दुसऱ्यांना नावं ठेवण्याचा हक्क आहे. जर आपल्याला जमलं नाही तर ते काम खूप अवघड आहे."यानंतर सायली म्हणाली, "मला वाटतं की, आपण प्रयत्न करुन बघायला हवा. छान रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा झाडे, स्वच्छता हवी, प्लॅस्टिक नको हे सगळं करण्यासाठी काय मेहनत लागते हे आपणही बघितलं पाहिजे. म्हणजे फक्त व्यवस्थेला आणि शासनाला नावं ठेवण्यापेक्षा त्यात उतरून काय काय करावं लागतं हे बघितलं पाहिजे.

## काही वर्षांपूर्वी शिकलो असतो तर

अमिताभ बच्चन ८३ वर्षांचे आहेत, पण या वयातही ते कामात जोमाने व्यस्त राहतात. ते रात्री उशिरापर्यंत सोशल मीडियावर सक्रिय असतात, ट्विटर आणि ब्लॉगवर पोस्ट लिहितात. अमिताभ चित्रपट आणि "कौन बनेगा करोडपती" वर देखील काम करत आहेत. पण त्यांना सध्या एका गोष्टीचा पश्चाताप आहे आणि ती नेहमीच त्यांची राहील. अमिताभ यांनी अलीकडेच त्यांच्या ब्लॉगवर याबद्दल लिहिले आहे की जर त्यांनी एक वर्षापूर्वीच याकडे लक्ष दिले असते तर ते अधिक चांगले झाले असते. अमिताभ बच्चन यांनी अलीकडेच वयामुळे त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर आणि कौशल्यांवर कसा परिणाम झाला आहे याबद्दल सांगितले. आज ज्या गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करत आहेत त्या अनेक वर्षांपूर्वी शिकल्या असायला हव्यात याबद्दल ते दुःख व्यक्त करतात. अमिताभ यांनी त्यांच्या ब्लॉगवर लिहिले, "दररोज काहीतरी शिकायला मिळते, आणि खंत इतकी आहे की ती खूप वर्षांपूर्वी शिकायला हवी होती. खंत आणखी मोठी आहे कारण आता जे शिकले जात आहे ते तेव्हा अस्तित्वात नव्हते आणि काळ आणि वयानुसार, शिकण्याची इच्छा, प्रयत्न आणि ऊर्जा कमी होत चालली आहे." अमिताभ बच्चन पुढे लिहितात, "नवीन शोध आणि नवीन प्रणालींचा वेग इतका वेगवान आहे की जेव्हा तुम्ही त्या शिकायला सुरुवात करता तेव्हा वेळ निघून गेलेला असतो. म्हणून, आजच्या अनेक बैठकींमधून निष्कर्ष असा आहे की मूलभूत गोष्टी पूर्णपणे समजून घ्याव्यात, नंतर काम पूर्ण करण्यासाठी सर्वोत्तम प्रतिभा आणि तज्ज्ञांना नियुक्त करा, आणि तेच झाले."अमिताभ यांनी पुढे सांगितले की, जर तुम्हाला एखादे काम करता येत नसेल, किंवा तुम्हाला ते माहित नसेल, किंवा तुम्ही त्यासाठी पात्र नसाल, तर ते ठीक आहे. तुम्ही ते काम करू असे म्हणू शकता आणि नंतर ते तुमच्या आवडत्या तज्ज्ञांना सोपवून ते पूर्ण करू शकता.

## शेफाली जरीवालाचा ब्लॅक मॅजिकमुळे मृत्यू?



प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री शेफाली जरीवालाचे गेल्या वर्षी (२०२५) वयाच्या ४२ व्या वर्षी निधन झाले. तिच्या अचानक निधनामुळे केवळ तिच्या कुटुंबालाच नव्हे तर तिच्या चाहत्यांनाही मोठा धक्का बसला. सुरुवातीला, तिच्या चाहत्यांना विश्वासच बसत नव्हता की शेफाली जरीवालाने या जगाचा निरोप घेत आहे. खरं तर, आजही लोक शेफाली या जगात नाही यावर विश्वास ठेवण्यास कचरतात. तिचा पती पराग त्यागी अजूनही पत्नीच्या मृत्यूच्या दुःखातून सावरलेले नाही. पती पराग त्यागीने अलिकडेच एक पॉडकास्ट यूट्यूब चॅनेल सुरू केले आहे.पराग त्यागीला त्याच्या पत्नीचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. जणू काही त्याने शेफालीच्या स्मृतीसाठी आपले जीवन समर्पित केले आहे. खरं तर, पराग त्यागीने त्याच्या पत्नीच्या मृत्यूबाबत एक धक्कादायक खुलासा केला आहे. पराग म्हणतो की शेफालीवर काळी जादू करण्यात आली होती आणि तो यावर पूर्णपणे विश्वास ठेवतो. खरं तर, पराग त्यागीने पारस छाब्राच्या पॉडकास्टवर हे विधान केले.पॉडकास्टमध्ये पराग म्हणाला, "मला माहित आहे, यार. बरेच लोक या गोष्टींवर विश्वास ठेवत नाहीत, पण मला माहित आहे, मला विश्वास आहे की हे कोणीतरी केले आहे." पराग पुढे म्हणाला, "मी हे सांगू शकत नाही की हे कोणी केले, पण कोणीतरी केले. कारण मला काहीतरी चूक आहे असे वाटते." पराग त्याच्या पत्नीची आठवण करून खूप भावनिक होतो.

## भारताचा 41 धावांनी पराभव

## न्यूझीलंडचा 2-1 असा मालिका विजय

# विराट कोहलीचे शतक व्यर्थ

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली गेली. या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय सामना इंदूरमध्ये खेळला गेला. या सामन्यात न्यूझीलंडने भारताचा ४१ धावांनी पराभव केला आहे. नाणेफेक गमावणाऱ्या न्यूझीलंड संघाने डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलिप्स यांच्या शतकाच्या जोरावर ८ गडी गमावून ३३७ धावा केल्या आहेत. भारताला ४६ ओव्हरमध्ये सर्वबाद ३३८ धावाच करता आल्या. परिणामी भारताला ४१ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या विजयासह न्यूझीलंडने ही मालिका २-१ ने आपल्या नावे केली आहे.**

## डॅरिल मिशेल एक्सप्रेस सुसाट!







न्यूझीलंडने दिलेल्या ३३८ धावांचा पाठलाग करायला भरतीती संघ चांगलाच अडचणीत आला होता. दिग्गज फलंदाज लवकरच माघारी गेले होते. ७१ धावांवर भारताच्या ४ विकेट्स गेल्या होत्या. रोहित शर्मा ११ धावा करून बाद झाला. तर कर्णधार शुभमन गिलही २३ धावा करू शकला. उपकर्णधार श्रेयस अय्यर देखील झटपट ३ धावा करून बाद झाला. मागच्या सामन्यातील शतकवीर केएल राहुल १ धाव घेऊन पव्हेलियनमध्ये गेला. संघ अडचणीत असताना विराट कोहलीने नितीश कुमारच्या साथीने विराटने डाव सावरला. या दोघांनी ८८ धावा जोडल्या. नितीश ५७ चेंडूत ५३ धावा करून माघारी गेला. त्याने २ चौकार आणि २ षटकार लगावले. त्याला ख्रिश्चन क्लार्कने बाद केले. रवींद्र जाडेजा १२ धावा करून बाद झाला.

एका बाजूने विकेट्स जात होत्या, त्यानंतर विराट कोहलीने डाव सावरला. त्याने ९२ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. विराटने हर्षित राणाला साथीला घेऊन डाव गेहून जाण्याचा प्रयत्न केला पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

हर्षित राणाने ४३ चेंडूत ५२ धावा केल्या. त्यामध्ये त्याने ४ चौकार आणि ४ षटकार लगावले. त्यांनंतर मोहम्मद सिराज भोपळा न फोडता माघारी गेला. दरम्यान, विराट कोहली १०८ चेंडूत १२४ धावा करून बाद झाला.

त्याने या खेळीत १० चौकार आणि ३ षटकार लगावले. तो मैदानात होता तोपर्यंत भारत सामना जिंकेल असे वाटत होते. मात्र तो बाद झाला आणि भारताने सामना गमावला. कुलदीप यादव ५ धावांवर धावबाद झाला आणि अर्शदीप सिंग ४ धावांवर नाबाद राहिला. न्यूझीलंडकडून झॅकेरिन फॉल्क्स, ख्रिश्चन क्लार्क यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या तर लेनॉक्सने दोन विकेट्स घेतल्या. तर काइल जेमिसनने १ विकेट घेतली.भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसरा सामना इंदूर येथे खेळला जात आहे.

या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करत डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलिप्स यांच्या शतकाच्या जोरावर ८ गडी गमावून ३३७ धावा उभ्या केल्या आहेत. या सामन्यात शतकवीर डॅरिल मिशेलने आणखीएका टप्प्याला गवसणी घातली आहे. त्याने शतक झळकवून ठोकून इतिहास रचला आहे. भारतात भारतीय संघाविरुद्ध किमान चार एकदिवसीय शतके ठोकणारा मिशेल जगातील दुसराच फलंदाज ठरला आहे.

रविवारी इंदूरच्या होळकर स्टेडियमवर भारतीय संघाविरुद्ध तिसऱ्या सामन्यात ३४ वर्षीय उजव्या हाताचा फलंदाज डॅरिल मिशेलने भारतात आठव्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाविरुद्ध चौथे एकदिवसीय शतक झळकवले. डॅरिल मिचेलने १०३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले डॅरिल मिचेलचे या मालिकेत हे सलग दुसरे शतक ठरले. डॅरिल मिचेल १३१ चेंडूत १३७ धावा करून बाद झाला. डॅरिल मिशेलच्या आधी, ही कामगिरी दक्षिण आफ्रिकेच्या एबी डिव्हिलियर्सने केली होती.

### भारताविरुद्ध लागोपाठ दुसरे शतक

एबी डिव्हिलियर्सने दक्षिण आफ्रिकेसाठी भारतीय संघाविरुद्ध भारतात ११ एकदिवसीय सामने खेळले आणि पाच शतके ठोकली. एकूण पाच फलंदाजांनी भारतात भारतीय संघाविरुद्ध तीन एकदिवसीय शतके ठोकण्याचा पराक्रम केला आहे.मिशेलने भारतात भारतीय संघाविरुद्धच्या शेवटच्या पाच एकदिवसीय सामन्यांमध्ये चार शतके झळकावली आहेत. भारतात खेळलेल्या त्याच्या शेवटच्या पाच सामन्यांमध्ये, डॅरिल मिशेलने १३०, १३४, ८४, १३१ आणि १३७ धावा केल्या आहेत.

# जैस्वालने ध्रुव जुरेलवर हात उगारला

## काणाखाली बसण्याआधीच वाचला जुरेल;पंतच्या जागी जुरेल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मालिकेतील तिसरा आणि निर्णायक वनडे सामना इंदूरमध्ये खेळला जात आहे. भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि न्यूझीलंडला आधी फलंदाजीसाठी उतरवले. मात्र सामना सुरू होण्यापूर्वीच टीम इंडियाच्या कॅम्पमध्ये एक मजेशीर आणि चर्चेचा प्रसंग घडला.**



सामन्यासाठी निघण्यापूर्वी संघ बसमध्ये चढत असताना हा प्रसंग घडला. यशस्वी जैस्वाल बसकडे पुढे जात होता, तर त्याच्या मागे ध्रुव जुरेल चालत होता. याच वेळी जुरेलने यशस्वीची थोडीशी चेष्टा केली. ही गोष्ट यशस्वीला फारशी आवडली नाही आणि त्याने जुरेलवर हात उगारला.मात्र, यशस्वीने फक्त हात उगारला, पण मारला नाही. त्यामुळे ध्रुव जुरेल काणाखाली खात-खात वाचला. व्हिडिओमध्ये जुरेलने नेमके काय केले, हे स्पष्ट दिसत नसले तरी हा सगळा प्रकार मस्ती-मजाकाचाच असल्याचे स्पष्ट होते. कारण दोघेही हसत-खेळत बसमध्ये चढताना दिसले.ध्रुव जुरेलला या मालिकेदरम्यान भारतीय संघात संधी मिळाली आहे.

ऋषभ पंतला दुखापतीमुळे पहिल्या वनडेनंतर संघाबाहेर जावे लागले, त्यानंतर वडोदरा वनडेनपूर्वी जुरेलचा संघात समावेश करण्यात आला.

विजय हजारे ट्रॉफीत चांगली कामगिरी करून आलेल्या जुरेलला मात्र या वनडे मालिकेत अद्याप अंतिम अकरामध्ये खेळण्याची संधी मिळालेली नाही. मात्र त्यालाही या मालिकेतील एकाही सामन्यात खेळण्याची संधी मिळालेली नाही.

### यशस्वीलाही मालिकेत संधी

हा प्रसंग सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, टीम इंडियातील खेळाडूंमधील मैत्रीपूर्ण वातावरणाचेच दर्शन घडवत आहे.सामन्यासाठी निघण्यापूर्वी संघ बसमध्ये चढत असताना हा प्रसंग घडला. यशस्वी जैस्वाल बसकडे पुढे जात होता, तर त्याच्या मागे ध्रुव जुरेल चालत होता. याच वेळी जुरेलने यशस्वीची थोडीशी चेष्टा केली. ही गोष्ट यशस्वीला फारशी आवडली नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। सोमवार ।

दि. 19 जानेवारी 2026

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


## पिंपरी-चिंचवडसह भोसरीमध्ये

# आमदार महेश लांडगे यांचा करिष्मा कायम!

### महापालिका निवडणूक : भोसरी मतदार संघातील 48 पैकी 35 जागांवर वर्चस्व


। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज


**पिंपरी-चिंचवड: शहरातील राजकारणात भोसरी विधानसभेत सर्वांचे लक्ष लागले होते. राष्ट्रवादीचे अजित पवार यांना थेट आव्हान म्हणून आमदार महेश लांडगे यांचा भोसरी विधानसभेकडे राजकीय वर्तुळात चर्चेची ठरली. यामुळे येथील जवळपास 12 प्रभागातील उमेदवारांची लढाई अटीतटची ठरली. या लढतीमध्ये भाजपाच्या 48 जागांपैकी 35 जागांवर भाजपाचे पारडे जड ठरले. दरम्यान, गत वर्षी 32 जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी झाले होते. या निवडणुकीत 3 नगरेवकांमध्ये वाढ झाली आहे. हा सर्व विजय आमदार लांडगे यांचा डाव असल्याचे बोलले जाते.**






महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी, शिवसेना या पदाधिकारी व माजी नगरसेवकांचा प्रवेश घडवून आणला होता. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. ही नाराजी निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला किंबहुना आमदार महेश लांडगे यांना अडचणीत येणार होती. त्यातच राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी सर्वच उमेदवरांच्या तोंडाचे पाणी पळवले. त्यापैकी प्रभाग क्रमांक 1,5,7,8 या प्रभागात राष्ट्रवादीचे पारडे जड ठरले. तर, शहरातील राष्ट्रवादीचे एकमेव आमदार व विधानसभेचे उपसभापती असलेले अण्णा बनसोडे यांच्या पुत्राचा विजय हा भोसरीतील विजयाच्या गडाला तडा जाणार ठरला. कारण, प्रभाग 9 या ठिकाणी भाजपाचे सूंपर्ण पॅनल पराभूत झाले होते. हे पॅनल निवडणून आणण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी लक्ष घातले होते. त्यासाठी काँग्रेसेचे माजी नगरेसवक सद्गुरु कदम यांना पक्षात प्रवेश दिला होता. पण, हा गड भाजपाला राखता आला नाही. प्रभाग 8 या ठिकाणी देखील राष्ट्रवादी वरचढ ठरली असून, चारपैकी दोन राष्ट्रवादीच्या नगरेसवकांची खाते उघडली आहेत. या ठिकाणी भाजपाचे माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी व निलम लांडगे यांचा पराभव झाला आहे. विशेष म्हणजे प्रभाग 1 साठी अटीतटीची लढत ही राष्ट्रवादीने खेचून आणली. या प्रभागात केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. तसेच, आमदारांच्या बालेकिल्ल्यातील एक जागा निसटली असून, तेथे राष्ट्रवादीचे विराज लांडे विजयी झाले.

#### आमदारांच्या प्रभागात एक जागा निसटली

- प्रभाग 1, 7 आणि 8 मध्ये राष्ट्रवादीचा करिश्मा
- प्रभाग 9 मध्ये भाजपाच्या संपूर्ण पॅनलची पिछेहाट
- निवडणुकीच्या तोंडावर आयात उमेदवर चमकले
- राष्ट्रवादीला 12 जागांवर समाधान
- भाजपातील बंडखोरांचा पराभवाचा धक्का
- भोसरीतील चार दिग्गजांचा नवख्या उमेदवरांकडून पराभव

#### 5 जागांवर भाजपाचे वर्चस्व

भोसरीतील पाच जागांवर भाजपाचे वर्चस्व कायम राखले आहे. त्यापैकी प्रभाग दोन, तीन, चार या प्रभागात बाजी मारत वर्चस्व कायम राखले आहे. या ठिकाणी भाजपाला जास्त मताधिक्य मिळाले. तर, सहा आणि दहा या दोन्ही ठिकाणी आघाडी घेतली. तर, अन्य जागेवर काहीशी पिछेहाट झाली असली तरी, भाजपाचे प्रत्येकी दोन ते तीन जागा राखल्या आहेत.

---

# चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे 52 पैकी अवघ्या 10 जागांवर वर्चस्व!

### महापालिका निवडणूक : मतदार संघात भाजपाचे 52 पैकी 37 नगरसेवक विजयी


। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज


**पिंपरी-चिंचवड: पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वाधिक मोठा असलेला चिंचवड विधानसभा मतदार संघात भाजपा पक्षाने आपला करिश्मा कायम राखला आहे. निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली महापालिका निवडणुकीत 52 पैकी 37 नगरसेवक विजयी झाले आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 10 नगरसेवक, शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) 5 नगरसेवक निवडून आले आहेत.**



राज्यातील सर्वांत मोठा विधानसभा मतदार संघापैकी चिंचवड हा एक मतदार संघ आहे. मतदार संघात तब्बल 6 लाख 76 हजार 638 मतदार आहेत. हाऊसिंग सोसायट्या, रो हाऊस, अनधिकृत बांधकामे, बैठी घरे असे दाट लोकवस्तीचा हा मतदार संघ आहे. सांगवीपासून सुरू होणारा हा मतदार संघ किवळे-मामुर्डीपर्यंत पसरला आहे. मतदार संघात उच्चभ्रू, उच्च शिक्षित, मध्यवर्गीय व कामगार वर्ग आहे. झपाट्याने विकसित झालेला हा मतदार संघ आहे. पवना नदी या मतदार संघातून वाहते. भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेस व इतर पक्षाचे माजी नगरसेवक व पदाधिकारी फोडत पक्षात प्रवेश दिला. त्यातील अनेकांना उमेदवारीही देण्यात आली. मतदार संघात महापालिकेचे 16, 17, 18, 22, 23, 24, 25, 26, 27, 28,29,31 आणि 32 असे एकूण 13 प्रभाग असून सर्वाधिक 56 नगरसेवक येतात. भाजपाचे सर्वाधिक नगरसेवक विजयी करून मतदार संघ सेफ करण्यावर आ. शंकर जगताप यांनी भर दिला होता.

आमदार शंकर जगताप यांची ही पहिलीच टर्म आहे. त्यांना आमदार होऊन वर्षभराचा कालावधी झाला आहे. यापूर्वी दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप तसेच, माजी आमदार अश्विनी जगताप यांनी मतदार संघाचे नेतृत्व केले आहे. जगताप कुटुंबाला मानणारा हा मतदार संघ आहे. शंकर जगताप यांनी महापालिका निवडणुकीचे भाजपाचे निवडणूक प्रमुख म्हणून संपूर्ण मतदार संघात प्रचाराचे सूक्ष्म नियोजन केले.

## आमदार अमित गोरखे राजकीय संघर्षाचे प्रमुख केंद्रबिंदू ठरले

# पिंपरी विधानसभेत राष्ट्रवादीला 24 पैकी 14 जागांवर यश!

## महापलिका निवडणूक : भाजपापेक्षा मतदार सरस कामगिरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: पिंपरी विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित जातींसाठी राखीव असलेला आणि शहराच्या राजकारणात सातत्याने केंद्रस्थानी राहिलेला मतदारसंघ मानला जातो. या मतदारसंघाचे सध्याचे प्रतिनिधी अण्णा बनसोडे हे सलग तिसऱ्यांदा आमदार असून, विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची राज्यपातळीवरही भूमिका महत्त्वाची आहे. दुसरीकडे, भाजपकडून या मतदारसंघात प्रभावी संघटन उभारणारे विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे हेही या राजकीय संघर्षाचे प्रमुख केंद्रबिंदू ठरले होते.**




या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत पिंपरी मतदारसंघातील राजकारणात 'अनुभव विरुद्ध संघटन' आणि 'घराणेशाही विरुद्ध पक्षशिस्त' अशा अनेक छटा स्पष्टपणे दिसून आल्या. मतदारसंघात प्रभाग क्रमांक 10, 14, 15, 20, 21 आणि 30 असे सहा प्रभाग असून, एकूण 24 नगरसेवक निवडून येतात. सुमारे 3 लाख 99 हजार 811 मतदार असलेल्या या मतदारसंघात झोपडपट्टीबहुल भाग, मध्यमवर्गीय वसाहती आणि उच्चभ्रू परिसर यांचे मिश्र स्वरूप आहे. त्यामुळे निवडणूक लढत ही केवळ एका सामाजिक घटकापुरती मर्यादित राहत नाही.

नुकत्याच जाहीर झालेल्या निकालांमध्ये भारतीय जनता पार्टीने 12 जागांवर विजय मिळवत आपली ताकद कायम ठेवली आहे. विशेष म्हणजे मागील निवडणुकीतही भाजपने इतक्याच जागा जिंकल्या होत्या. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसने मागील वेळेपेक्षा एक जागा अधिक मिळवत 14 नगरसेवक निवडून आणले आहेत. आकड्यांमध्ये फारसा फरक नसला, तरी राजकीय पातळीवर हा बदल महत्वाचा मानला जात आहे. या निकालातील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे दोन्ही प्रमुख नेत्यांच्या कुटुंबीयांचा विजय. आमदार अण्णा बनसोडे यांचे पुत्र सिद्धार्थ बनसोडे यांनी निवडणूक जिंकत स्थानिक राजकारणात यशस्वी प्रवेश केला आहे. दुसरीकडे, भाजपचे आमदार अमित गोरखे यांच्या मातोश्री आणि माजी नगरसेविका अनुराधा गोरखे यांनीही विजय मिळवत गोरखे कुटुंबाची पकड अधोरेखित केली आहे. त्यामुळे या निवडणुकीत 'दोन घराण्यांचा प्रभाव' हा मुद्दा प्रकर्षाने पुढे आला आहे.

निवडणुकीपूर्व काळात दोन्ही पक्षांत मोठ्या प्रमाणावर फोडाफोड झाली. मावळ मतदार संघात खासदारकीला नशीब आजमवले संजोग वाघेरे यांना पक्षात घेऊन भाजपाने संख्याबळ वाढवण्याचा प्रयत्न केला, तर राष्ट्रवादीने संदीप वाघेरे यांना आपल्या गोटात घेत भाजपाच्या रणनीतीला छेद दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सभांनी राष्ट्रवादीच्या प्रचाराला धार चढवली, तर भाजपने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आक्रमक प्रचार केल्याचे दिसून आले.

एकूण निकाल पाहता पिंपरी विधानसभा मतदारसंघावर कोणत्याही एका पक्षाचे निर्विवाद वर्चस्व निर्माण झालेले नाही. भाजपने आपली जागा टिकवली असली, तरी राष्ट्रवादीने संख्याबळ वाढवत आघाडी घेतली आहे. त्याचबरोबर, सिद्धार्थ बनसोडे आणि अनुराधा गोरखे यांच्या विजयामुळे येत्या काळात या मतदारसंघातील राजकारण अधिक व्यक्तिकेंद्रित आणि तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी मतदारसंघातील ही नवी राजकीय मांडणी राज्याच्या राजकारणात महत्त्वाची ठरणार आहे. महापालिका निवडणुकीत भाजपने 12 जागांवर विजय; मागील निवडणुकीतील कामगिरी कायम.

### आमदार पुत्राचा राजकारणात प्रवेश...

1. राष्ट्रवादीने 14 जागा जिंकत मागील वेळेपेक्षा एक जागेची वाढ नोंदवली.
2. भाजप आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्षांत निवडणुकीपूर्वी फोडाफोड; संख्याबळ वाढवण्याचे प्रयत्न.
3. संजोग वाघेरे भाजपमध्ये; राष्ट्रवादीकडून संदीप वाघेरे यांना घेऊन पलटवार.
4. अण्णा बनसोडे यांचे पुत्र सिद्धार्थ बनसोडे यांचा विजय; स्थानिक राजकारणात यशस्वी प्रवेश.
5. अमित गोरखे यांच्या मातोश्री अनुराधा गोरखे विजयी; गोरखे कुटुंबाची पकड कायम.

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे 'हॅपी क्लासरूम' विषयावर शिक्षक प्रशिक्षण

## शिक्षण विश्व : आनंदी व तणावमुक्त शिक्षणासाठी शिक्षक सक्षमीकरणावर भर

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे "हॅपी क्लासरूम" या विषयावर शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. आनंदी, तणावमुक्त व सकारात्मक शिक्षण वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.**




या प्रशिक्षणाचे मार्गदर्शन सुप्रसिद्ध प्रशिक्षक मा. शिल्पा गुजारे व मा. मनीषा काळे यांनी केले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांचा आनंद, भावनिक स्वास्थ्य आणि सक्रिय सहभाग वाढवणाऱ्या नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींवर विशेष भर देण्यात आला. शिक्षक–विद्यार्थी नातेसंबंध अधिक सकारात्मक कसे ठेवावेत, तसेच सहानुभूती व सर्जनशीलतेच्या माध्यमातून प्रभावी वर्गव्यवस्थापन कसे करावे, याचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

संवादात्मक सत्रे, विविध उपक्रम आणि प्रत्यक्ष वर्गातील उदाहरणांमुळे प्रशिक्षण अधिक प्रभावी व उपयुक्त ठरले. दैनंदिन अध्यापनात मानसिक आरोग्य, सजगता (माइंडफुलनेस) आणि सकारात्मक प्रोत्साहनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपले अनुभव शेअर केले, ज्यामुळे सत्रे अधिक समृद्ध झाली.

आनंदी व समावेशक वर्ग वातावरणामुळे शिकण्याची गुणवत्ता कशी वाढते आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येतो, हे या प्रशिक्षणातून स्पष्ट झाले. शाळा व्यवस्थापनाने प्रशिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक करत प्रशिक्षणात शिकवलेल्या पद्धती प्रत्यक्ष अध्यापनात अमलात आणण्याचे आवाहन केले. अशा उपक्रमांमधून प्रियदर्शनी स्कूलची सर्वांगीण शिक्षण आणि शिक्षक सक्षमीकरणाप्रतीची बांधिलकी अधोरेखित झाली असून, हा कार्यक्रम आनंदी वर्गसंस्कृती निर्माण करण्याच्या नव्या उत्साहाने संपन्न झाला.

> "वर्गखोली आनंदी, सुरक्षित आणि सकारात्मक झाली तरच खरे शिक्षण घडते. शिक्षकांनी सहानुभूती, सजगता आणि सर्जनशीलतेने अध्यापन केल्यास प्रत्येक विद्यार्थी आत्मविश्वासाने शिकू शकतो. 'हॅपी क्लासरूम' ही केवळ संकल्पना नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे."
> –**शिल्पा गुजारे**, प्रशिक्षक.

## राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचा शहरात दारूण पराभव

# तुषार कामठे यांचा अपयशानंतर शहराध्यक्षपदाचा राजीनामा

### पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार) शून्यावर

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने आणि पक्षाचा एकही उमेदवार विजयी न झाल्याने त्यांनी ही नैतिक जबाबदारी स्वीकारली असल्याचं स्पष्ट केलं आहे.**



**महापालिका निवडणुकीत शरद पवार गट शून्यावर**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट झाल्यानंतर दोन्ही गट स्वतंत्रपणे निवडणूक रिंगणात उतरले होते. या निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार) गटाला शहरात यश मिळालं, मात्र राष्ट्रवादी (शरद पवार) गटाला एकही जागा जिंकता आली नाही.

काही प्रभागांमध्ये मैत्रीपूर्ण लढती असल्या तरी अनेक ठिकाणी अजित पवार गटाचेच उमेदवार मैदानात होते. याचा थेट फटका शरद पवार गटाला बसल्याचं त्रि निकालातून स्पष्ट झालं आहे.

**दारुण पराभवाची जबाबदारी शहराध्यक्षांवर**

या निवडणुकीतील अपयशाची जबाबदारी स्वीकारत शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. पक्षसंघटन मजबूत ठेवण्यासाठी आणि संघटनात्मक शिस्त पाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

शहरात पक्षाला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने, तसेच कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर हा राजीनामा महत्त्वाचा मानला जात आहे.

नैतिक जबाबदारी स्वीकारत दिला राजीनामा राजीनाम्यानंतर तुषार कामठे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले,

“निवडणुकांमध्ये पक्षाला अपेक्षित यश मिळू शकले नाही. या निवडणुकीतील अपयशाची संपूर्ण नैतिक जबाबदारी स्वीकारत मी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे. पक्षाने दिलेल्या जबाबदारीनुसार मी निष्ठेने काम करण्याचा प्रयत्न केला. मात्र निकाल अपेक्षेप्रमाणे लागला नाही.”

**संघटनात्मक शिस्तीसाठी निर्णय**

कामठे पुढे म्हणाले, “पक्षाच्या हितासाठी आणि संघटनात्मक शिस्त पाळण्यासाठी ही जबाबदारी स्वीकारणं आवश्यक आहे. पदावर राहण्यापेक्षा पक्ष मजबूत करण्यासाठी कार्यकर्ता म्हणून काम करणं अधिक महत्त्वाचं आहे. पक्षाच्या ध्येय-धोरणांवर विश्वास ठेवून मी पुढेही काम करत राहीन.”

त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

**शहरात शरद पवार गटाची पुढची वाटचाल काय?**

महापालिका निवडणुकीत शहरात राष्ट्रवादी (शरद पवार) चा एकही उमेदवार निवडून न येणं हा पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. शहराध्यक्षांच्या राजीनाम्यानंतर आता नव्या नेतृत्वाची निवड, संघटनाची पुनर्बांधणी आणि आगामी राजकीय रणनिती याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, हा पराभव केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, शहरातील संघटनात्मक कमजोरी आणि गटबाजीचं प्रतीक आहे. त्यामुळे येत्या काळात शरद पवार गटासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये नव्याने बांधणी करणं मोठं आव्हान ठरणार आहे.

---

# खासदार-आमदार यांचे पुत्र प्रथमच पालिका सभागृहात

### पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत पक्षबदलूंना मतदारांचा दणका

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत पक्षांतर करणाऱ्या उमेदवारांच्या राजकीय भवितव्याची कसोटी लागली होती. मतदारांनी काही ठिकाणी ‘आयाराम’ उमेदवारांना विजयी केले, तर काहींना घरी बसवले. पक्ष बदलून निवडणूक लढवलेल्या २८ उमेदवारांना विजय मिळाला, तर ११ जणांना पराभवाची नामुष्की पत्करावी लागली. त्यामुळे पक्षांतराचा निर्णय काहींसाठी फायदेशीर, तर काहींसाठी घातक ठरला आहे.**



या निकालांमुळे महापालिकेच्या राजकारणात पक्षनिष्ठेपेक्षा उमेदवाराची स्थानिक पकड, कामगिरी आणि वैयक्तिक प्रतिमा अधिक प्रभावी ठरल्याचे सिद्ध झाले आहे. यातून विकासकामे, स्थानिक विश्वास आणि उमेदवाराची वैयक्तिक प्रतिमा निर्णायक ठरल्याचे चित्र दिसले. या निकालांनी पक्षबदल ही हमखास यशाची हमी नसल्याचे स्पष्ट केले. सत्तेसाठी पक्ष बदलण्यापेक्षा मतदारांशी असलेली नाळ अधिक महत्त्वाची ठरल्याचे अधोरेखित झाले. भविष्यात पक्षांतर करताना उमेदवारांना मतदारांच्या भूमिकेचा गांभीर्याने विचार करावा लागेल, हे निकालानंतर स्पष्ट झाले.

**भाजपवासी झालेल्या या उमेदवारांना मिळाला विजय**

राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातून भाजपमध्ये गेलेले जालिंदर शिंदे, कुशाग्र कदम, प्रवीण भालेकर, राजू ऊर्फ शरद मिसाळ, आशा सूर्यवंशी, अपर्णा डोके, विनोद नढे, राहुल कलाटे, शकुंतला धराडे, श्याम जगताप, नवनाथ जगताप आणि प्रशांत शितोळे यांनी मतदारांचा विश्वास कायम राखत विजय मिळविला.

**पक्षबदलूंना मतदारांचा दणका**

शिवसेनेतून राष्ट्रवादीत गेलेल्या ाधना काशीद, रूपाली आल्हाट, रेखा दर्शिले यांना पराभवाला सामोरे जावे लागले. भाजपमधून राष्ट्रवादीत गेलेल्या अश्विनी जाधव, सीमा सावळे, धनंजय काळभोर, अश्विनी चिंचवडे यांचाही पराभव झाला. राष्ट्रवादीतून भाजपमध्ये गेलेल्या अनुराधा गोफणे, प्रसाद शेट्टी, उषा वाघेरे तसेच शिवसेनेतून भाजपमध्ये गेलेल्या मीनल यादव यांनाही मतदारांनी नकार दिला.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046